# पिकाच्या आधारभूत किंमती खरंच शेतकऱ्यांना मिळतात काय?



पाऊस पडून पिके उभी राहिल्यामुळे गणपत निवांत होता. देवदर्शन आटोपून तो संपतची वाट पाहत पारावर बसला होता. संपतनेही दर्शन घेऊन गणपतच्या जवळ बैठक मारली व म्हणाला,

''का रं गंपा, आज फार लवकर आलेला दिसतो आणि निवांतही दिसतोय?

''हो रे संपा, सकाळचे सर्व काम आटोपल्यानंतर घरात जास्त बसायला नाही जमत. म्हणून आलो होतो लवकर. आता शेतीची बरीचशी कामे आटोक्यात आली. त्यामुळे जास्त धावपळ करायची गरज नाही. आता पाणी भरायचा जास्त त्रास नाही. तणं काढणे किंवा पिकावर फवारण्या करणे या दोन कामांव्यतिरिक्त जास्त काम नाही.''

संपतही मान डोलावून म्हणला, ''हो रे गंपा. मागील महिन्यात फार धावपळ करावी लागली. आताशी कोठे उसंत मिळाली बघ. आता काय चांगलं पीक आणण्यासाठी तणं काढणे, खत देणे, औषधांच्या फवारण्या देणे यासारखी कामं! चागलं उत्पादन मिळालं की वर्षभर चांगले दिवस जातात!''

यावर मात्र गणपत नकारार्थी मान डोलावून म्हणाला, ''हे मला मान्य नाही बघ संपा. चांगलं उत्पादन, भरपूर शेती पिकली तर शेतकऱ्यांचा फायदा होतो हे मला मान्य नाही. कारण जास्त उत्पादन मिळाले की बाजारभाव पडतात. कमी उत्पादन आले की बाजारभाव उठतात. यातून दोन्हीही ठिकाणी शेतकरी मरतो. सरकार म्हणतं, जास्त पीक आलं त्यामुळे मागणी नाही म्हणून भाव पडले. व्यापारी तर अशा संधीचं सोनं करायला टपूनच बसलेले असतात. भाजीपाल्याची तर वाटच लावली जाते. फळपिकांचेही हेच हाल होतात. अन्नधान्याच्या पिकांमध्ये बदल होतो. परंतु या पिकांतून किती पैसे मागे राहतात शेतकऱ्यांना, हा एक संशोधनाचा विषय आहे.''

यावर संपत म्हणाला, ''आरं गंपा, याचाच विचार करून केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या शेतमालाला विशेषत: धान्यपिके, कापूस, ऊस यांना उत्पादन खर्चावर आधारित कमीत कमी आधारभूत किंमती जाहीर केल्या आहेत. यावर्षीही अनेक पिकांच्या आधारभूत किंमतीमध्ये वाढ

केली आहे. या आधारभूत किंमतीमुळे पिकाचे उत्पादन जास्त आले आणि बाजारभाव कोसळले तर शेतकऱ्यांचा शेतीमाल आधारभूत किंमतीमध्ये सरकार विकत घेते किंवा तशी व्यवस्था करते. त्यामुळे तू जास्तीत जास्त उत्पादन काढ म्हणजे तुला जास्त पैसे मिळतील पिकातून.''

यावर मात्र गणपत मोठ्याने हसून म्हणाला, ''आरं संपा, मला नको सांगू तुझ्या त्या आधारभूत किंमतीचे. किती वाढविल्या रे पिकांच्या किंमती? क्विंटलला ५०-१०० रुपये! मक्याला तर २० रुपये क्विंटल. तुला माहीत आहे का संपा, यावर्षी सरकारने सरासरी २ ते ५ टक्के याप्रमाणे शेतीमालाच्या आधारभूत किंमतीमध्ये वाढ केली. आता तू मला सांग, ही शेतकऱ्यांची चेष्टा आहे की नाही? बियाण्यांच्या किती किंमती वाढल्या? डिझेल पेट्रोलचे दर वाढल्यामुळे शेतीला लागणाऱ्या सर्व खर्चात वाढ झाली. नांगरणीचे दर १५०० वरून २००० रुपये एकर झाले. ही किती टक्के वाढ झाली? मजुरीचे दर ५० ते १०० रुपये वाढले. खतांच्या किंमती वाढता वाढता राहिल्या; नाहीतर जीव द्यायला पैसे मिळाले नसते! कीटकनाशके, तणनाशके यांच्या किंमतींबरोबरच फवारणी करणाराही जास्त पैसे घ्यायला लागला. आता संपा, तूच हिशोब लाव की आपल्या शेतीच्या उत्पादन खर्चात किती वाढ झाली ते? मला तर कळतच नाही की अशी कोण हुशार माणसे बसविली आहेत सरकारने की ते पिकाच्या किंमती काढून त्यानुसार शेतीमालाला भाव देतात. मला वाटते नोकरदार असतील आणि त्यांचा शेतीच्या उत्पादनाशी आणि त्यांच्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहाशी काहीही संबंध नसेल. परंतु संपा, मला त्यांना एक सांगायचं आहे की तुम्ही जर सरकारकडून दरवर्षी कमीत कमी १० टक्के पगारवाढ करून घेता, ती महागाई भत्त्यांच्या नावाखाली. मग शेतकऱ्यांनाही महागाईला सामोरे जावे लागते. त्यांच्याही शेतीमालाला सरसकट १० टक्के भाववाढ द्या म्हणजे विषय राहणार नाही. मला तर वाटतं सरकारने कोणत्याही शेतीमालाचे एकदाच योग्य ते भाव काढावे आणि नंतर त्यांच्या कर्मचाऱ्यांना जेवढा महागाई भत्ता देता तेवढीच वाढ प्रत्येक शेतीमालाला द्यावी. एवढे केले तरी शेतकरी गरीब राहणार नाही आणि सरकारपुढे हात पसरणार नाही.''

गणपतच्या या सर्व गोष्टीकडे संपत शांतपणे बघत आणि ऐकत होता. गणपत थोडा शांत झाल्यावर संपत म्हणाला, ''हे बघ गंपा, तू म्हणतो ते एकदम बरोबर आहे. परंतु शासकीय धोरण आणि त्यांच्या काही अडचणी असतील. त्यामुळे ते एवढ्या मोठ्या प्रमाणात शेतीमालाचे दर वाढवून नाही देऊ शकत! त्यामुळेच ते थोडी थोडी दरवाढ दरवर्षी करतात. पण एक चांगली बाब तर आहे ना की आपल्या शेतीमालाला आधारभूत किंमती जाहीर केल्यामुळे आपले पिकाचे उत्पादन जास्त आले तरी आपल्याला बाजारभाव कोसळण्याची भीती राहत नाही.''

यावर मात्र गणपत जास्तच गंभीर होऊन बोलू लागला, ''कारं संपा, आज तू मला काय चिडवून देण्याचाच विचार करून आला आहेस काय? तुला काय माहीत नाही का की पिकाचे जास्त उत्पादन आल्यानंतर त्याच्या किंमती कमी होतात. सरकार म्हणतं आम्ही खरेदी करू. पण कधी, कोठे, किती, कसे खरेदी करणार, आहे का काही याबद्दल कायमस्वरुपी व्यवस्था? सरकारचे वरातीमागून घोडे असते. शेतीमालाचे दर पडले आणि ते ओरडायला लागले की सरकारला जाग येते. त्यानंतर चर्चा-मीटिंग होतात. मग निर्णय होतो. कोठे, कसा, कधी आणि किती शेतमाल विकत घ्यायचा, त्यामध्ये मांजर आडवी जाते. धान्य भरायलाच बारदान नाही. वजन करायला कीट नाही. विकत

घ्यायला मनुष्यबळ नाही. मग अनेक सर्कशीतून डोंगर पोखरून उंदीर काढल्यासारखी थोडीफार खरेदी होते. या सर्व सर्कशीला सामोरे जाण्यासाठी अल्प व अत्यल्पभूधारक शेतकऱ्यांची तयारी नसते. कारण त्यांच्याकडे असा किती शेतमाल विकायला असतो? एवढी सर्कस करण्याची त्यांची बौद्धिक, आर्थिक आणि शारीरिक क्षमता संपलेली असते. त्यामुळे हे सर्व होईपर्यंत त्याच्याकडचा शेतीमाल व्यापाऱ्याच्या तावडीमध्ये गेलेला असतो. व्यापारी, शेतकरी आणि आधारभूत किंमत हा त्रिकोण आहे. ते कधीच जवळ येऊ शकत नाही. तुला माहीत आहे ना संपा, मागील वर्षी मका १२००- १३०० रुपये क्विंटलने विकला. मक्याची आधारभूत किंमत १८५० रुपये क्विंटलने किती शेतकऱ्यांना ही किंमत मिळाली. मी यावर्षी गहू १६०० रुपये क्विंटलने व्यापाऱ्याला दिला. गव्हाला आधारभूत किंमत १९२५ आहे. आता तू सांग, या आधारभूत किंमतीमध्ये गहू खरेदी करण्यासाठी आपल्याकडे शासकीय यंत्रणा आहे काय? त्यामुळे या आधारभूत किंमती म्हणजे शेतकऱ्यांना दाखविलेले नुसतं गाजर आहे. दाखवायचं पण खाऊ घालायचं नाही? सरकारला एवढीच शेतकऱ्यांची कीव येत असेल आणि त्यांच्यासाठी काहीतरी करावे असे वाटत असेल तर त्यांनी कायदाच करावा. जो कोणी शेतकऱ्यांना शेतीमाल कमीत कमी आधारभूत किंमतीच्या कमी घेईल त्याला तात्काळ अटक करण्यात येईल. अशा प्रकारचा गुन्हा केल्यास त्याला जामीन मिळणार नाही. कमीत कमी पाच वर्षे जेलची हवा खायला लागेल. एवढं करावं आमच्या मायबाप सरकारने. मग आम्ही करतो शेतात काम, काढतो चांगलं उत्पादन आणि खाऊ घालतो देशातील कोट्यवधी जनतेला तेही न रडता.'' गणपतने येथे मोठा श्वास घेतला आणि शांत झाला.

यावर संपत म्हणाला, ''हे बघ गंपा, तू म्हणतो ते एकदम १०० टक्के बरोबर आहे. आज मी काही तुला डिवचण्यासाठी येथे बसलो नाही. तुझ्या भावना त्या माझ्याही भावना आहेत. मी तर म्हणतो गंपा, आज तू जे विचार मांडले ते सर्वश्रेष्ठ आहेत. याच भावना आपल्या देशातील सर्व शेतकऱ्यांच्या असतील असे मला वाटते. खरं तर शेतीमालाला कमीत कमी आधारभूत किंमती देणे, त्यामध्ये दरवर्षी प्रामाणिक विचार करून वाढ करणे आणि या आधारभूत किंमतीतच शेतीमाल विकला जाणे या तीनही गोष्टी होण्यासाठी प्रयत्न केले जातात. परंतु यामध्ये आपल्या देशातील पोकळ यंत्रणा आणि स्वार्थीपणा यामुळे या गोष्टी प्रत्यक्षात उतरायला वेळ लागत आहे. गंपा, तुला सांगतो तू जे मुद्दे मांडले आहेत त्यावर सर्वांनी एकत्रित प्रयत्न करून त्यानुसार सरकारला योग्य ती उपाययोजना करण्यासाठी, राबविण्यासाठी भाग पाडण्याची गरज आहे. खरं तर पाऊस आला नाही किंवा काही नैसर्गिक आपत्ती आली तर आपण एकवेळ त्याकडे पाठ करू शकतो परंतु शेती चांगली पिकूनही शेतकऱ्यांचा खिसा खाली राहिला आणि त्याला जर मानवी हस्तक्षेप जबाबदार असेल तर त्याला मात्र माफ केले नाही पाहिजे. अर्थात गंपा, आता शेतकरी राजा जागा होत आहे. हे आता जास्त दिवस नाही सहन होणार शेतकऱ्यांना. ज्याप्रमाणे तुझ्या मनातील धगधग बाहेर आली तशीच सर्वांची बाहेर आली तर क्रांती व्हायला वेळ लागणार नाही. पण आता चल, आपण अशाच गप्पा मारत राहिलो तर शेतात कोण क्रांती करणार? चल मी स्पेशल चहा पाजतो तुला, आज छान मन मोकळं केलं बघ!''

**(सौजन्य : पूर्वा कृषिदूत परिवार)**

■